## नि.दि.मु.क्र. ७५/२००८ मधील आय.ए.क्र. २/२०२१ (निशाणी १६९) वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ ने प्रस्तुत अर्ज वकिलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक होण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे असे म्हणणे आहे की वादीने प्रस्तुत दावा हक्कप्रस्थापनेकरीता दाखल केलेला आहे. दावा अंतिम सुनावणीस आलेला असताना सदर दाव्याची सुनावणी न करता वादी हे दांडगाईने अतिक्रमण करुन दावा मिळकतीत काडीचाही हक्कसंबध नसताना संडास व संडासच्या टाकीचे बांधकाम करुन दावा मिळकत बळकाविण्याच्या प्रयत्नात आहेत. वादींनी दि. २८/०१/२०२१ रोजी दावा मिळकतीत संडासचे व संडासच्या टाकीचे बांधकाम दांडगाईने करणार असल्याची खात्री झाल्याने प्रतिवादी क्र. १ ने सरपंच कोळंब ग्रामपंचायत व ग्रामसेवक कोळंब ग्रामपंचायत यांच्याकडे तक्रारी अर्ज केला. वादींना सदर बातमी मिळताच त्यांनी प्रतिवादी क्र. १ च्या पुतण्याला धमकाविले. दुसऱ्या दिवशी वादींनी संडास व संडासच्या टाकीचे बांधकाम करण्याच्या उद्देशाने खड्याचे खोदकाम देखील सुरु केले. वादींनी दांडगाई करुन बांधलेल्या संडासचे व संडासच्या टाकीच्या बांधकाम दावा मिळकतीत कोठे करण्यात आलेले आहे किंवा कसे व त्याचे मोजमापाची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येण्याकरीता कोणाही वकिलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात यावी अशी प्रतिवादी क्र. १ ने विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादींनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रतिवादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कोणत्या तरतूदीखाली येते हे नमूद केलेले नाही असा आक्षेप घेतलेला आहे. सदर अर्जाप्रमाणे प्रतिवादी दावा विषयाची स्थानिक तपासणी करु पाहत आहे. परंतु या अर्जानुसार कोर्ट कमिशनरची नेमणूक करता येणारी नाही. वादी आणि प्रतिवादी यांना दावा विषयक मिळकतीची माहिती आहे. तसेच प्रतिवादी पुरावा

आणण्यासाठी कोर्ट कमिशनरचा वापर करीत आहे. परंतु कायद्याने तसे करता येणारे नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी वादींनी विनंती केली आहे.

४. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजूंची वादकथने व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. वादींनी प्रस्तुत दावा हा सरसनिरस वाटपाकरीता दाखल केलेला आहे. वादींचे दाव्यात असे कथन आहे की प्रतिवादी क्र. १ ने दावा मिळकतीमधील वादीचा हिस्सा हक्कहितसंबंध फेरफार क्र. ६३४ चे चौकशीचे कामी दि. २२/०४/२००८ रोजी नाकारला. त्यामुळे त्यांना त्यांच्या १/८ एकत्रातील हिश्श्याचे सरस निरस वाटप होवून मिळण्याकरीता दावा दाखल करावा लागला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची निशाणी ३६ कडील कैफियत पाहता त्यांनी वादींचा दावा मिळकतीमध्ये कोणताही प्रकाराचा संबंध नसल्याचे कथन केलेले आहे. मात्र दोन्ही बाजूंच्या वादकथनांवरुन असे दिसते की दावा मिळकतीमध्ये वादींचे बांधकाम आहे. वादी आता नव्याने संडास व संडासच्या टाकीचे बांधकाम करीत आहे असे प्रतिवादी क्र. १ चे कथन आहे. वादी व प्रतिवादींची वादकथने पाहता संडासचे व संडासच्या टाकीच्या बांधकाम हा वादाचा विषय आहे. त्याकरीता वादी व प्रतिवादींची केवळ तोंडी पुराव्याचा उपयोग होणार नाही असे माझे मत आहे. सदरच्या बाबीचे विवेचन करण्यासाठी स्थानिक अन्वेषण होणे गरजेचे आहे असे मला वाटते. दावा मिळकती संडासचे व संडासच्या टाकीच्या बांधकाम निश्चित कोठे आहे हे समजण्यासाठी व त्याचे माजमापासंबंधी माहीती व त्याचे स्थाननिश्चित होण्यास न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करणे गरजेचे आहे.

६. वरील सर्व विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येतो. | |

| | | |
|---|---|---|
| | मालवण वकील संघातील वकील श्री.एस.के.जाधव यांची नेमणूक न्यायालयीन आयुक्त म्हणून अर्जात नमूद असलेल्या गोष्टींबाबत पाहणी करुन त्याबाबतचे वस्तुस्थितीचा स्वयंस्पष्ट अहवाल दाखल करण्यासाठी करण्यात येते. | |
| | न्यायालयीन आयुक्त यांनी दोन्ही बाजूंना आगावू सुचनापत्रे काढून वर नमूद मिळकतींची मोजणी करुन वस्तुस्थितीबाबतचा सविस्तर अहवाल व मोजणी नकाशा न्यायालयात सादर करावा. | |
| | न्यायालयीन आयुक्त यांनी त्यांचा अहवाल आयुक्तपत्र मिळाल्यापासून लवकरात लवकर सादर करावयाचा आहे. | |
| | प्रतिवादी क्र. १ ने आयुक्त शुल्क म्हणून रक्कम रुपये ५०००/– न्यायालयात पुढील तारखेपर्यत अथवा तत्पुर्वी जमा करावेत. | |
| | वरील आदेशाप्रमाणे मोजणी होण्याकामी न्यायालयीन आयुक्त यांना आयुक्तपत्र व संबंधीत कागदपत्र पाठविण्यात यावी. | |

Digitally signed by Bhanupratap Basantsingh Chouhan
Date: 2021.02.12 18:15:48 +0530

दि. १२/०२/२०२१ भानुप्रताप ब. चौहान

मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

"CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT."

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER